# 'कुंभारांच अर्थकारण'

प्रा. संभाजी शंकर कांबळे ,समाजशास्त्र विभाग ,श्रीपतराव चौगुले आर्ट्स ॲण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली ,ता. पन्हाळा जि. कोल्हापूर , राज्य : महाराष्ट्र

---

**प्रस्तावना :-**

मानवाने आपल्या जीवनामध्ये अन्नसंकलन अवस्थेपासून ते स्थिर शेती करण्याच्या अवस्थेपर्यंत प्रगतीच केली आणि स्थिर शेती करण्याच्या अवस्थेमध्ये मनुष्याच्या जीवनाला एक दिशा मिळाली. अर्थात या त्याच्या स्थिर जगण्याच्या पद्धतीमध्येच खेड्याचा उदय झाला. शेती व्यवसायाने केलेल्या प्रगतीने आणि खेड्यांच्या झालेल्या विकासामुळे शेतकऱ्याला (गावाला) शेतीच्या निमित्ताने आवश्यक वाटणाऱ्या गरजा भागविण्याच्या दृष्टीने वेगवेगळे व्यवसाय करणारे गट निर्माण झाले. त्यांच्यामार्फत गावाची (शेतकऱ्याची) सेवा करण्यात येऊ लागली. अर्थात सेवेच्या देवाणघेवाणीतून प्रत्येकजण आपली गरज भागवू लागला. यातूनच बलुतेदार आणि आलुतेदार असे दोन वर्ग निर्माण झाले. यातील बलुतेदाराच्या सेवेअभावी शेतकऱ्याचे अडते म्हणून तो महत्वाचा बलुतेदार मानला जातो, तर ज्याच्या सेवेशिवाय शेतकऱ्याचे काहीच अडत नाही त्याला अलुतेदार असे म्हणतात.

'कुंभार' हा एक बलुतेदार असल्याने या समाजाने आजपर्यंत इतरांच्यासाठी दिलेले योगदान पहाणे महत्वाचे आहे. भारतीय समाज व्यवस्थेमध्ये बारा बलुतेदार व अठरा आलुतेदार अशी रचना असलेली दिसून येते. या बारा बलुतेदारांमध्ये कुंभार समाजाचा समावेश होतो. 'कुंभ' म्हणजे माती आणि मातीला आकार देणारा 'कुंभार' असे संबोधण्यात येते. तसेच कुंभ म्हणजे मातीचा घडा, अशा घड्याला जो बनवितो, आकार देतो तो कुंभार म्हणून ओळखला जातो.

**उद्दिष्ट्ये :-**

१. कुंभार समाजाच्या पारंपारिक व्यवसायाचा अभ्यास करणे.

२. वीट व्यवसायातील कामगारांच्या समस्यांचा अभ्यास करणे.

३. वीट व्यवसाय करणाऱ्या कुटुंबाचा अभ्यास करणे.

४. कुंभार समाजातील वीट भट्टी व्यवसाय लोप पावण्याच्या कारणमिमंसाचा अभ्यास करणे.

५. कुंभारांच्या अर्थकारणांचा अभ्यास करणे.

*** संशोधन विषयाची निवड :-**

कोल्हापूर जिल्हयातील कुंभार समाज आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे. त्याच्याकडे भागभांडवल पुरेसे नसल्याने तो हा व्यवसाय कमी प्रमाणात करीत आहे. याच परिस्थितीचा फायदा उठवीत इतर ठेकेदारांनी या व्यवसायात आपली मक्तेदारी निर्माण केलेली आहे. म्हणूनच कदाचित हा वीट व्यवसाय कुंभार समाजातून लोप पावण्याच्या मार्गावर असलेला दिसून येतो. म्हणून कुंभार समाजाचा कोल्हापूर जिल्यातील वीट व्यवसायाची या संशोधन पेपरसाठी निवड करण्यात आलेली आहे.

**गृहितकृत्ये :-**१. पारंपारिक व्यवसाय लोप पावत असल्याने कुंभार समाजातील लोक इतर व्यवसायाकडे वळलेले आहेत.

**२. महागाई वाढल्यामुळे वीट भट्टी व्यवसाय परवडत नसल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची बनलेली आहे.**

**३. वीट व्यवसायातील कामगारांच्या मध्ये आरोग्याची समस्या निर्माण झाली आहे.**

**४. विटांची मागणी कमी झाल्यामुळे वीट व्यवसाय बंद पडण्याच्या मार्गावर आहे.**

**५. वीट व्यवसायाकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे.**

**६. कुंभार समाजाच्या वीटभट्टी व्यवसायातील घटक :-**

**कुंभार समाजाच्या वीटभट्टी व्यवसाय फार पूर्वीपासून चालत आलेला दिसून येतो. हा व्यवसाय म्हणजे कुंभार समाजाचे उदर निर्वाहाचे महत्वाचे साधन आहे. त्यामुळे वीट भट्टी व्यवसायातील घटकांची माहिती पुढीलप्रमाणे समजावून घेता येईल.**

**अ) आळकरी :- आळकरी म्हणजे चिखल तयार करून त्यापासून वीटा तयार करणारा कारागीर होय. आळकरी म्हणून स्त्री-पुरुष दोघेही कामे करतात. आळकऱ्याला चिखल तयार करून त्यापासून वीटा तयार करताना खूप श्रम करावे लागते. त्यामुळे त्याला अनेक वेळा पाठीच्या मणक्याचा दु:खण्याचा त्रास होतो. कधी पायाला चिखलामध्ये खिळे, काच, तार किंवा पत्रा लागण्याची शक्यता असते.**

**ब) विटाळे :-वीट तयर करीत असताना लाकडी किंवा लोखंडी आयताकृती साचा वापरला जातो. त्याला विटाळे असे शास्त्रीय भाषेमध्ये म्हंटले जाते. भारतीय मानक संस्थेच्या** (Indian Standard Institute) **निर्देशाप्रमाणे विटेचा प्रमाणित आकार १९×९×९ से.मी. किंवा १९×९×४ से.मी. असा मान्य केलेला आहे. महाराष्ट्रात २२×११×६ $\frac{१}{२}$ से.मी. विटांचा आकार आज प्रचलित आहे.**

**क) हारोळी :- वाळलेल्या विटांचा ओळीने एक विशिष्ट थर तयार केला जातो. तो थर तयार करीत असताना प्रत्येक विटांच्यामध्ये तीन इंच अंतर ठेवून रचल्या जातात. याचे कारण वीट विटभट्टीवर रचण्यासाठी कामगाराला उचलून घेणे सोपे जाते व विटांची मोडतोड होऊ नये हे आहे यालाच हारोळी असे म्हंटले जाते.**

**ड) भटकरी :-भटकरी म्हणजे वीट भाजण्याची कला अवगत असणारा कारागीर होय. याला भटकर म्हणूनही ओळखले जाते. वीट भट्टीमध्ये विटा भाजत असताना त्या कशा पद्धतीने भाजल्या जाव्यात याची सर्व माहिती या भटकरी व्यक्तिला अवगत असते. भटकरी हा या व्यवसायातील महत्वाचा कारागीर मानला जातो. कारण वीट व्यवस्थित भाजली नाही तर ती विकत घेतली जात नाही.**

**ई) वीटभट्टी(आवा) :- वीटा भाजण्याकरिता विटांचीच भट्टी रचली जाते. खाली गोवऱ्या वा लाकडे पेटवितात. पाच-सहा विटांचे थर व त्यावर कोळसा, परत विटांचे थर ह्या प्रमाणे भट्टी रचली जाते. विटांच्या मधल्या थरांमध्ये अर्धवट जळालेली राख वापरली जाते. त्यामुळेवीट आतून भाजून निघते. त्यानंतर आव्याला एका बाजूने पेटवून दिले जाते. तसेच आव्यामधून धूर बाहेर पडण्यासाठी वाट करून दिली जाते. अशा प्रकारची वीट भट्टीची रचना केलेली असते.**

***वीट व्यवसायातील समस्या:-**

**१. मोकळ्या जागेची कमतरता:- वीट व्यवसाय करण्यासाठी कमीत कमी २० गुंठे तरी**

**मोकळी जागा असावी लागते. ज्या कुंभार कुटुंब प्रमुखांना स्वतःची जागा नाही. अशी कुटुंबे एक तर भाडे तत्वाने किंवा विटा देणाऱ्या बदल्यात दुसऱ्याची मोकळी जागा वीट व्यवसायासाठी घेतात. हीच मोकळ्या जागेच्या संदर्भातील वीट व्यवसाय करणाऱ्या कुंभार कुटुंबाची ही खरी समस्या आहे.**

**२. मातीवरील वाढती रॉयल्टी:- शासनाने कुंभार समाजाचे वार्षिक उत्पन्न वीस हजारापेक्षा जास्त असेल तर त्यांना रॉयल्टी भरणे बंधनकारक केले. त्यामुळे प्रत्येक ट्रॉलीला १०० रुपये प्रमाणे रॉयल्टी भरणे बंधनकारक केले. याचा परिणाम त्यांच्या व्यवसायावर होऊन आज कुंभार व्यावसायिक अतिशय गंभीर परिस्थितीतून जात असते.**

**३. वाहतुकीवरील वाढता खर्च:- वाहतुकीसाठी ट्रक,ट्रॉली, व डंपरचा वापर केला जातो. सध्या डिझेलचे दर वाढल्यामुळे आणि सतत वाढत असल्याने वाहतुकीसाठी किमान दोन किलोमीटरला ५००/- रुपये वाहतुकीवर ज्यादा खर्च होत असल्यामुळे या व्यवसायावर परिणाम होत आहे असे दिसून येते.**

**४. जळाऊ लाकूड, बगॅस, कोंडा व दगडी कोळसा यांची कमतरता:-**

**वीट व्यवसायासाठी अत्यंत महत्वाचे घटक म्हणून लाकूड, बगॅस , कोंडा व दगडी कोळसा या घटकांकडे पाहिले जाते. पण सरकारने नवनवीन जंगल संवर्धनाचे कायदे केले आहेत. त्यामुळे वृक्ष तोडणीसाठी शासनाची परवानगी घ्यावी लागते. बगॅस व भाताचा कोंडा मोठ्या प्रमाणात उपलब्ध होऊ शकत नाही. अशा प्रकारे जळावू लाकूड व इतर घटकांची मोठ्या प्रमाणात कमतरता भासते.**

**५. पाण्याची कमतरता :- मातीपासून चिखल तयार करताना पाणी मोठ्या प्रमाणात वापरावे लागते. यासाठी नदीचे पाणी विहिरीचे पाणी किंवा बोअरवेलचे पाणी वापरले जाते. उन्हाळयामध्ये तर पाण्याची मोठी कमतरता भासते. कारण त्याचवेळी शेतीसाठी मोठ्या प्रमाणात पाणी वापरले जाते. अशा वेळी या वीट व्यवसायासाठी पाणी मिळू शकत नाही. ही एक समस्या आहे.**

**६. कामगारांची समस्या :- वीट व्यवसायासाठी अनेक कामगारांची गरज लागते. कारण माती उकरण्यासाठी व भरण्यासाठी कामगार आज मिळत नाहीत म्हणून वीट बांधणी व्यवसायासाठी कामगारांची टंचाई दिसून येते. ती पुढीलप्रमाणे :-**

**अ) आळकरी :- आळकरी म्हणजे मातीचा चिखल तयार करून त्या चिखलापासून वीटा तयार करणारा कारागीर होय. या कामगाराला कामावर येण्याअगोदर पावसाळ्यामध्ये २० ते ४० हजार रुपये अॅडव्हान्स द्यावा लागतो. अर्थातच छोट्या किंवा मध्यम स्थानिक कुंभार व्यावसायिकांना आळकऱ्याला एवढी अॅडव्हान्स देणे कधी कधी शक्य होत नाही त्यामुळे त्याला कामगार मिळू शकत नाहीत ही एक समस्या आहे.**

**ब) भटकरी :- भटकरी हा वीट व्यवसायातील तज्ञ व कुशल कामगार म्हणून ओळखला जातो. कारण वीट भाजण्याची कला अवगत असल्यामुळे त्याला या व्यवसायामध्ये महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. पण अशा भटकऱ्यालाही पावसाळ्यामध्ये ३० ते ४० हजार रुपये अॅडव्हान्स**

**द्यावा लागतो. त्यामुळे मध्यमवर्गीय कुंभार व्यावसायिकाला अॅडव्हान्स अगोदर देणे परवडत नाही. ही मोठी समस्या आहे.**

- **निष्कर्ष :-**

**१. मातीच्या रॉयल्टीवर सतत वाढ होत असल्याने हा व्यवसाय लोप पावण्याच्या मार्गावर आहे.**

**२. या व्यवसायामध्ये भांडवलदार वर्गाचा शिरकाव मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे कुंभार समाजाचा हा व्यवसाय लोप पावत आहे.**

**३. मोठ्या जागेची कमतरता निर्माण झाल्यामुळे हा व्यवसाय बंद होण्याच्या मार्गावर आहे.**

**४. वाहतुकीचा वाढता खर्च डिझेल महागाईमुळे होत असल्यामुळे वाहतूक परवडत नाही.**

**५. जळावू लाकूड, बगॅस, भाताचा कोंडा व दगडी कोळसा याची कमतरता निर्माण झाल्यामुळे हा व्यवसाय लोप पावत आहे.**

*** सारांश :-**

**वीट व्यवसाय करणाऱ्या कुंभार कुटुंबाला आपला वीट व्यवसाय करताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. कारण त्यांची आर्थिक परिस्थिती फार चांगली नसल्यामुळे त्याला कर्ज काढावे लागते. वीट व्यवसायासाठी मोकळी जागा भाड्याने घ्यावी लागते. काही वेळा कच्च्या वीटा तयार केल्यानंतर अचानक पाऊस पडून फार मोठे नुकसान होते. तसेच तयार झालेल्या वीटा रोखीने न विकल्यामुळे त्या तशाच शिल्लक राहिल्यामुळे त्यांच्याकडून होणारी आर्थिक उलाढाल ठप्प होते. त्यामुळे आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते. अशा प्रकारे कुंभारांच अर्थकारण असलेले दिसून येते. यामध्ये सुधारणा व्हावयाची असेल तर शासनाने भरघोस आर्थिक मदत केली पाहिजे.**

*** संदर्भ ग्रंथ :-**

**१. अत्रे त्रि. ना. : 'गावगाडा' पुनर्मुद्रण १९९५, प्रकाशक – ह. भ. भावे. पुणे.**

**२. नाडगोडे गुरुनाथ, - 'ग्रामीण समाजशास्त्र' कॉन्टीनेन्टल प्रकाशन – पुणे**

**३. कुंभार रा. स. : 'धांडोळा' : भारतीय कुंभारांचा' ( खंड – १ व २ ) मुक्ता पब्लिशिंग, हाऊस : कोल्हापूर**

**४. बोबडे प्रकाश : 'भारतीय समाज रचना' विद्या प्रकाशन, नागपूर, २००७**

**५. डॉ. लुलेकर प्र. जी. : 'गावगाड्याचा शिल्पकार'स्वरूप प्रकाशन' औरंगाबाद १५ ऑगस्ट २००९**

**६. प्रा. भोसले के. एम., प्रा. काटे के. बी. : 'भारतीय अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन, कोल्हापूर २००४**

**७. पाटील जे. एफ. : 'अर्थदर्शन' लोकसंख्या वयोरचना दै. लोकमतमधील लेख. दि. २१/१०/२००४**

८. Lewis A. Coser : 'Masters of Sociological Thought'Ravat Publications, New. Delhi – 1996

९. Ram Ahuja : 'Research Methods' : Rawat Publication, Jaipur, 2007

**१०. प्राचार्य डॉ. जे. के. पवार, प्रा. एस. एस. कांबळे : 'कुंभारांच अर्थकारण' राजप्रकाशन, कोल्हापूर, २०१७**